दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १७४ । शनिवार २८ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## मनपा कर्मचाऱ्यांचे थकीत पगार तातडीने अदा करण्याचे निर्देश

### मनपा स्थायी समिती सभेत विविध विषयांना मंजुरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती पै. सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत शहरातील विविध विकास कामांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली, तसेच विविध विभागांमध्ये मानधनावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासही हिरवा कंदील देण्यात आला.

सभेत महापालिका कर्मचाऱ्यांच्या थकीत पगाराचा मुद्दा गाजला. फेब्रुवारी व मार्च महिन्यांचे पगार अद्याप न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. यावर सभापती लोंढे यांनी प्रशासनाला स्पष्ट आदेश देत, महापालिकेच्या खात्यातून तातडीने कर्मचाऱ्यांचे पगार अदा करावेत. शासनाकडून निधी आल्यानंतर तो खात्यात वर्ग करावा, परंतु कर्मचाऱ्यांना विलंब होऊ देऊ नये, असे स्पष्ट निर्देश दिले.

सभेत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेवक निखिल वारे, सुरेश बनसोडे यांनीही विविध मुद्द्यांवर आपली मते मांडली.

तसेच सदस्य मनोज दुल्लम, नगरसेविका संध्या पवार, सोनाबाई शिंदे, मीनाताई चोपडा, गौरी बोरकर, पौर्णिमा गव्हाळे, उपयुक्त मेहर लहारे आदी उपस्थित होते.



#### विधिज्ञांचे पॅनल नियुक्तीचा विषय स्थगित

सभेमध्ये महापालिकेच्या न्यायालयीन प्रकरणांबाबत महत्त्वाची चर्चा झाली. यावेळी सदस्यांनी ''केवळ केस जिंकणाऱ्या वकिलांनाच पॅनलवर घ्यावे'' अशी ठाम मागणी केली. यावर सभापती सुभाष लोंढे यांनी ज्येष्ठ व अनुभवी वकिलांशी चर्चा करून सक्षम विधी तज्ज्ञांची नियुक्ती करावी आणि न्यायालयात महापालिकेची बाजू प्रभावीपणे मांडावी, असे निर्देश दिले. न्यायालयीन कामकाजासाठी विधी तज्ज्ञांना पॅनलवर नियुक्त करण्यासंदर्भातील विषय सध्या स्थगित ठेवण्यात आला.

## नगर शहर विधानसभा प्रमुखपदी बाबासाहेब सानप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश तर्फे सुरु असलेल्या मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षण () अभियानाअंतर्गत अहिल्यानगर शहर विधानसभा क्षेत्रासाठी विधानसभा प्रमुखपदी बाबासाहेब सानप यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात सानप यांचे अभिनंदन करत, त्यांच्या अनुभवाचा उपयोग करून मतदार याद्यांचे अचूक व सखोल पुनर्निरीक्षण होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक बूथवर -२ पदांच्या नियुक्त्या करून त्याची माहिती प्रदेश कार्यालयास पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या निवडीबद्दल पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषद सभापती ना. प्रा. राम शिंदे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी सानप यांचे अभिनंदन केले. सानप यांच्या नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर पक्षाची पकड अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



#### पक्षाने दिलेली जबाबदारी व्यवस्थित पार पाडणार

नियुक्तीनंतर बाबासाहेब सानप म्हणाले की, पक्षाने माझ्यावर ठेवलेला विश्वास ही मोठी जबाबदारी आहे. मतदारयाद्यांचे अचूक पुनर्निरीक्षण करून प्रत्येक पात्र मतदाराचे नाव यादीत समाविष्ट होईल, यासाठी मी कटिबद्ध आहे. कार्यकर्त्यांच्या सहकार्याने प्रत्येक बूथवर संघटन अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करणार आहे. सानप हे भाजपचे मागील ३५ वर्षांपासून सक्रिय सदस्य आहेत. अनेक वर्षांपासून भाजप जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत तसेच ते जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य आहेत.

## संजीवनी गिते यांचे दीर्घ आजाराने निधन

### दैनिक आकर्षणचे संपादक विजय सांगळे यांना भगिनी शोक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** घोडेगाव (ता. नेवासा) येथील पाटबंधारे कॉलनीमधील रहिवासी संजीवनी केरू गिते यांचे दीर्घ आजाराने काल, शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास निधन झाले. त्या ६३ वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर नगर येथील साईदीप रुग्णालयात उपचार सुरू होते. धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाच्या असलेल्या संजीवनी गिते या ''आक्का'' या नावाने परिचित होत्या. त्यांच्या मागे एक मुलगा, तीन विवाहित मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. नेवासा तालुक्यातील कौठा गावचे तलाठी रमेश गिते यांच्या त्या मातोश्री, तर दैनिक आकर्षणचे संपादक विजय सांगळे व नगर येथील शासकीय तंत्रनिकेतनमधील कर्मचारी राजू सांगळे यांच्या त्या भगिनी होत. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. आक्कांवर आज सकाळी घोडेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## लॉकडाऊनच्या अफवा पसरविणाऱ्यांवर कडक कारवाई करणार – फडणवीस

**मुंबई । वृत्तसंस्था–** देशात आणि राज्यात इंधनाचा तुटवडा नाही, एलपीजी गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा मुबलक साठा असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यामुळे लॉकडाऊन लागण्याच्या अफवा जर कुणी पसरवत असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. अशा अफवा पसरवून जर कुणी गोंधळाची स्थिती निर्माण करत असेल तर ते देशविरोधी काम आहे असंही फडणवीस म्हणाले. आपल्या देशाच्या डिप्लोमॅटिक रिलेशनशीपमुळे, पंतप्रधानांच्या नीतीमुळे इंधनाचा तुटवडा निर्माण होणार नाही, त्याची काळजी घेतली जात आहे असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिली.

मुख्यमंत्री म्हणाले की, ''शहरांमध्ये महानगरच्या माध्यमातून पीएनजी गॅस पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. याचं काम जलदगतीने सुरू आहे. त्यासंबंधी सरकारने एक आदेश काढलेला आहे. शहरांवरील एलपीजीचा लोड कमी करून पीएनजीवर भर दिला जाणार आहे. पीएनजीमुळे एलपीजीची भविष्यात समस्या किंवा अडचण येणार नाही.

### प्रत्येक महासभेला हजेरी लावण्याचा व्यक्त केला निर्धार

## नगर शहरातील आकाची गुंडगिरी मोडून काढणार

### कालच्या घटनेवर श्रीपाद छिंदमचा पत्रकार परिषदेत पलटवार । संबंधितांवर कारवाईसाठी एसपींना दिले निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महापालिकेच्या अंदाजपत्रकीय सभेत काल झालेला प्रकार नगर शहरातील आकाची शाब्बासकी मिळवण्यासाठी काही नगरसेवकांनी केला. परंतु आपण लोकशाही मार्गाने निवडून आलेलो असून अशा धमक्यांना घाबरत नाही. शहराच्या आकाची गुंडगिरी मोडून काढणार असल्याचे नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले. तसेच यापुढे मी प्रत्येक महासभेला हजेरी लावणार असून यासंदर्भात एसपींकडे अंगरक्षकाची मागणी केल्याचेही छिंदम यांनी सांगितले.



नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेत त्यांना निवेदन देऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली. (छाया – जाकीर शेख)

महापालिकेच्या काल झालेल्या अंदाजपत्रकीय सभेतून नगरसेवक छिंदम यांना सत्ताधारी व विरोधी नगरसेवकांनी कामकाजात सहभाग होऊ न देता बाहेरचा रस्ता दाखविला होता. यासंदर्भात आज छिंदम यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी निवेदन देऊन केली. दरम्यान, घटनेची योग्य ती चौकशी करून दोन ते तीन दिवसात कारवाईचे आश्वासन मिळाल्याचे छिंदम यांनी सांगितले.

शहराचा आका बोलतो तसं काही नगरसेवक शहरात वागतात. शाबासकी मिळवण्यासाठी सभागृहात कालचा प्रकार घडला. मात्र अशा धमक्यांना मी घाबरणार नाही. लोकशाही पद्धतीने निवडून आलो आहे. सभागृहात जाण्याचा माझा हक्क आहे., असे सांगून यापुढे प्रत्येक महासभेला मी उपस्थिती लावणार आहे त्यासाठी एसपीकडे अंगरक्षकाची रीतसर मागणी केली आहे, असेही छिंदम यांनी सांगितले.


## माळीवाडा वेस हा निजामशाहीचा कलंक, तो पुसला जावा ही फुलेप्रेमींची इच्छा...

### फुले स्मारकाला विरोध करणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर देऊ बाळासाहेब भुजबळ यांचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आपल्या देशावर दीडशे वर्ष राज्य करणाऱ्या इंग्रज राजवटीच्या खुणा पुसण्याचे काम भारतीयांनी केले आहे. देशभरात इंग्रज राजवटीशी संबंधित अनेक स्मारके, प्रतिमा आणि नावे बदलण्याचे प्रयत्न झाले आहेत. याचा उद्देश स्वतःच्या इतिहास आणि संस्कृतीला महत्त्व देणे. व्हिक्टोरिया टर्मिनसचे नामकरण छत्रपती शिवाजी टर्मिनस करण्यात आले. इंग्रज राजवटीशी संबंधित अनेक प्रतिमा आणि स्मारके हटवण्यात आली आहेत. चारशे वर्षांपूर्वी नगर शहरात निजामशाहीचे राज्य होते. माळीवाडा वेस ही निजामकालीन इतिहास सांगणारी पारतंत्र्याची व गुलामगिरीची जाणीव करून देणारी असून, ही वेस पाडल्यास हिंदुद्रोषी निजामशाहीचा इतिहास पुसला जाईल. परंतु खासदार नीलेश लंके हे माळीवाडा वेस पडू नये म्हणून प्रयत्न करीत असून, फुले स्मारकाला विरोध करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्यास चोख उत्तर दिले जाईल, असा इशारा ओबीसी व्हिजेएनटी जनमोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी दिला आहे. ■ पान ४ वर



#### अजित पवार यांच्या हस्ते मागील वर्षी झाले भूमिपूजन

नगर शहरात फुले दाम्पत्याचे स्मारक करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या हस्ते माळीवाडा वेस स्मारकाचे भूमिपूजन झाले. क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक होण्याचे स्वप्न फुलेप्रेमींनी पाहिले आहे. परंतु आठ महिन्यांचा कालावधी उलटला तरी देखील पूर्णाकृती पुतळ्याचे काम सुरू न झाल्याने महात्मा फुले प्रेमींमध्ये मोठा असंतोष पसरलेला आहे. स्मारक भव्य दिव्य व्हावे यासाठी माळीवाडा परिसरात मोठी जागा उपलब्ध होणे आवश्यक असून, त्यासाठी नियोजित स्मारकाभोवती असलेली अतिक्रमणे महानगरपालिकेने काढावीत, यासंदर्भात महापालिकेला निवेदन देण्यात आले आहे.

#### भव्यदिव्य स्मारक व्हावे ही फुलेप्रेमींची इच्छा

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा पहिल्यांदाच नगर जिल्ह्यामध्ये बसवून भव्यदिव्य स्मारक होत असल्याने महात्मा फुलेप्रेमींमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण दिसत आहे. स्मारक भव्यदिव्य व्हावे यासाठी जिल्ह्यातील महात्मा फुले प्रेमींनी फुले दांपत्य स्मारक समितीच्या माध्यमातून जिल्हा बैठक घेतली होती. या जिल्हा बैठकीत विविध समाजांतील नेते, अनेक नगरसेवक, तसेच जिल्ह्यातील महात्मा फुले प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नियोजित स्मारक भव्यदिव्य असे व्हावे, माळीवाडा चौकातून जाणाऱ्या पाचही रस्त्यावरून हे स्मारक दिसावे. शंभर वर्षाचा दृष्टिकोन ठेवून हे स्मारक होत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

## दै. आकर्षण निवडक

### श्रद्धा शुभम गांधी यांनी फायनान्शियल मॅनेजमेंट या विषयात डॉक्टरेट पदवी प्राप्त



अहिल्यानगर- जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात त्यांनी हा शोधप्रबंध केला २०२१ पासून त्यांनी आपल्या संशोधनाला प्रारंभ केले होते. त्यांच्या या संशोधनामुळे व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिकांना एक नवा दृष्टिकोन मिळणार असून, भविष्यातील आर्थिक नियोजनासाठी हे कार्य सर्वांना मार्गदर्शक ठरणार आहे. डॉ. श्रद्धा या नगर येथील नामांकित आय एम एस () कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ''हे यश केवळ माझे एकटीचे नसून, माझ्या कुटुंबीयांनी , सहकाऱ्यांनी, मित्रपरिवाराने दिलेल्या पाठिंब्याचे फलित आहे. व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिकांना माझ्या संशोधनातून नवीन दिशा मिळावी, हाच यामागील मुख्य उद्देश होता,'' अशी भावना डॉ. श्रद्धा गांधी यांनी व्यक्त केली. संसारिक आणि अध्यापनातील जबाबदाऱ्या सांभाळून मिळविलेल्या या विशेष नेत्रदीपक यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### प्रभाग क्र. ७ मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे व सुशोभिकरण करा



अहिल्यानगर- अहिल्यानगर महान महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ७ मधील ग्लोबस सेंटर ते जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय ते कराळे हेल्थ क्लबकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब झालेला असून रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. या परिसरामध्ये ( मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक व महिला मॉर्निंग वॉकसाठी फिरतात त्यांना धुळीचा प्रचंड असा त्रास सहन करावा लागतो ) मोठ्या प्रमाणात एम.आय.डी.सी. मध्ये काम करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना रस्त्याने ये-जा करणे मुश्किल झालेले आहे. सदरील रस्त्याचा वापर बालिकाश्रम रोडने बोल्हेगाव, एम.आय.डी.सी. परिसरामध्ये दैनंदिन कामकाजासाठी होतो. सदरील रस्त्याचे डांबरीकरण व सुशोभिकरण करणेबाबत या परिसरातील नागरिकांनी माझेकडे वेळोवेळी मागणी केली आहे. सदरील परिसरातील नागरिकांची समस्या लक्षात घेता या रस्त्याचे डांबरीकरण करणे व सुशोभिकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी प्रभाग क्र ७ मधील ग्लोबस सेंटर ते जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय ते कराळे हेल्थ क्लबकडे जाणा-या रस्त्याचे डांबरीकरण करणे व सुशोभिकरण करणेबाबत संबंधितांना योग्य ते आदेश देण्यात यावेत, ही विनंती. लवकरात लवकर डांबरीकरणाचे काम पूर्ण न झाल्यास प्रभागातील नागरिकांतर्फे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.

### बसपाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

अहिल्यानगर- बहुजन समाज पार्टीच्या जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक शहरात पार पडली. बसपाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत नवीन जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. आगामी जिल्हा परिषद निवडणुका व राहुरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेऊन पुढील रणनीती निश्चित करण्यात आली. या बैठकीस पुणे-खानदेश विभागाचे मुख्य झोन प्रभारी रामचंद्र जाधव आणि राज चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांनी जिल्हा कार्यकारिणी जाहीर करताना दक्षिण अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सुनील ओहोळ यांची नियुक्ती केली. जिल्हा उपाध्यक्ष म्हणून शहानवाज शेख यांची निवड करण्यात आली.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्यात डिजिटल कृषी क्षेत्रात सामंजस्य करार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विळद घाट येथे शेतकऱ्यांसाठी स्मार्ट आणि काटेकोर शेतीला चालना देण्यासाठी डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय (डीव्हीव्हीपी), अहिल्यानगर आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ (एमपीकेव्ही), राहुरी यांच्यात सामंजस्य करार () करण्यात आला आहे.

हा करार कृषी क्षेत्रात एआय, मशीन लर्निंग, मेकॅनायझेशन, मेकॅट्रॉनिक्स यांचा वापर करून डिजिटल कृषी नवोन्मेषाला प्रोत्साहन देणार आहे. या सहकार्यांतर्गत ड्रोनद्वारे पीक निरीक्षण, आयओटी आधारित शेती व्यवस्थापन, एआय आधारित निर्णय प्रणाली, संसाधन नकाशा तयार करणे, तसेच कृषी क्षेत्रातील अनेक नवीन उपक्रम व इतर विषयांवर संयुक्त संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जाणार आहेत. या ची वैधता तीन वर्षांची असून, नंतर नूतनीकरण करण्याची तरतूद आहे.

या सामंजस्य कराराचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे क्षमता विकास हा आहे . दोन्ही संस्था संयुक्तपणे विद्यार्थी , प्राध्यापक आणि शेतकऱ्यांच्या क्षमता विकासासाठी विविध कार्यक्रम राबवणार आहेत. यात एआय, मशीन लर्निंग, ड्रोन तंत्रज्ञान, आयओटी–आधारित शेती व्यवस्थापन, मेकॅट्रॉनिक्स आणि स्मार्ट फार्मिंग यावर विशेष प्रशिक्षण कार्यशाळा, हँड्स–ऑन ट्रेनिंग, इंटर्नशिप आणि सर्टिफिकेट कोर्सेसचा समावेश असेल. या प्रसंगी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी चे सन्माननीय कुलगुरु डॉ.व्ही.के.खरचे अध्यक्षस्थानी होते. अहिल्यानगर शहरातील सुमारे साडेचार दशकाची यशस्वी घोडदौड राबविणाऱ्या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय (डीव्हीव्हीपी) सोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे तयार होणारे तंत्रज्ञान व प्रणाली या राज्यातील शेतकरी कृषी शास्त्रज, कृषी आणि पारंपारिक अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व लोकांसाठी संयुक्तरीत्या उपयोगी ठरणार आहेत हे कुलगुरु महोदयांनी आपल्या भाषणात नमूद केले. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन चे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनील कल्हापुरे यांनी फौंडेशन अंतर्गत अभियांत्रिकी, कृषी, फार्मसी , मेडिकल व इतर शैक्षणिक संकुलांची, अभ्यासक्रमांची तसेच मागील साडेचार दशकांपासून जागतिक स्तरावर पोहोचलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा विषद केल्या.

# पैठण तालुक्यात शेतकऱ्यांना दिलासा

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–**तालुक्यात इंधन टंचाईमुळे शेतकरी अडचणीत सापडले असताना स्वाभिमानी शेतकरी संघटना पुढाकार घेत शेतकऱ्यांना दिलासा मिळवून दिला आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांच्याशी चर्चा करत शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या. या चर्चेनंतर शेतकऱ्यांना डिझेल व पेट्रोल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय, शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल देण्यासंदर्भात वरिष्ठ पातळीवरून मार्गदर्शन मिळाल्याची माहिती देण्यात आली आहे. यामुळे शेतीकामासाठी इंधनाची अडचण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

शेतकऱ्यांची समस्या सोडवण्यासाठी संघटना पुढेही सक्रियपणे काम करेल, असा विश्वास तालुका अध्यक्ष चंद्रकांत झारगड यांनी व्यक्त केला.

# पंधरा दिवसांत टरबुजांच्या दरात मोठी घसरण; शेतकरी आर्थिक संकटात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** जागतिक बाजारातील चढ-उतार, वाढलेली आवक आणि घटलेली मागणी यामुळे टरबुज उत्पादक शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. अवघ्या पंधरा दिवसांत टरबुजांच्या दरात मोठी घसरण झाली असून ३० रुपये प्रतिकिलो दर थेट ५ ते १० रुपयांवर आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

टरबुज लागवड ही नगदी पीक म्हणून ओळखली जाते. या पिकासाठी शेतकऱ्यांना प्रति एकरी सुमारे ४० ते ५० हजार रुपयांचा खर्च करावा लागतो. मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन, बियाणे, खते, कीटकनाशके तसेच मजुरी आणि वाहतूक खर्च यामुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. या खर्चाच्या तुलनेत मिळणारा दर अत्यंत कमी झाल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे.

यंदा मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत टरबुजाला चांगली मागणी राहील, अशी अपेक्षा होती. सुरुवातीला बाजारात २५ ते ३० रुपये प्रतिकिलो दर मिळत होता. मात्र अचानक बाजारात आवक वाढली आणि मागणी घटली. तसेच वाढत्या उन्हामुळे फळांची गुणवत्ता कमी झाल्याचा परिणामही दरांवर झाला. परिणामी दर कोसळून ५ ते १० रुपयांवर आले आहेत.

यामुळे अनेक शेतकऱ्यांनी टरबुजाची काढणी थांबवण्याचा किंवा पिके शेतातच सोडून देण्याचा निर्णय घेतला आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही ठिकाणी वाहतूक खर्चही परवडत नसल्याने माल बाजारात नेणेही कठीण झाले आहे. दरम्यान, शासनाने या परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी, तसेच टरबुज खरेदीसाठी हमीभाव किंवा बाजार हस्तक्षेप योजना राबवावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

# मॉडेल व्हिलेज पिंपळगाव उज्जैनी येथे सेंद्रिय शेती व महिला उद्योजकता कार्यशाळा

### कमिन्स इंडिया फाउंडेशनचा उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पिंपळगाव उज्जैनी येथे नवजीवन प्रतिष्ठान आणि सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया (ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था) यांच्या संयुक्त विद्यमाने सेंद्रिय शेती व महिला उद्योजकता विकास मार्गदर्शन कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

कार्यशाळेत बोलताना विशाल वांढेकर यांनी शेळीपालन हा शेतीला पूरक आणि उत्पन्न वाढवणारा महत्त्वाचा जोड व्यवसाय असल्याचे सांगितले. त्यांनी शेळीपालनाचे फायदे तसेच व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक बाबींचे सविस्तर मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थे मार्फत उद्योजकता जागरूकता कार्यक्रम राबवले जातात. या उपक्रमांतर्गत महिलांना विविध कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. या कार्यशाळेत प्रशिक्षक विशाल वांडेकर तसेच दिपक बत्तीशे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.



कमीन्स इंडिया कंपनीच्या आर्थिक सहकार्याने आणि नवजीवन प्रतिष्ठानच्या समन्वयाने मॉडेल व्हिलेज पिंपळगाव उज्जैनी येथे कमिन्स इंडियाच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीमधून शाश्वत विकासाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी सुरू आहे. सेंद्रिय शेती व उपजीविका विकास उपक्रमांतर्गत २५ महिलांच्या घरी परसबाग उभारण्यात आली तसेच २५ महिलांना शेळीपालनासाठी शेळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. त्याचबरोबर ५ महिलांना मुरघास बॅग व गांडूळ खत बॅग देण्यात आल्या आहेत.सेंद्रिय शेतीसाठी जीवामृत व अमृतपाणी तयार करण्यासाठी ३० महिलांना बॅरलचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेमध्ये सुसज्ज बहुउद्देशीय हॉल, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, तसेच एक विद्यार्थी एक वृक्ष या संकल्पनेतून आंबा व शेवग्याची रोपे वाटप करण्यात आली. जिल्हा परिषद शाळा व उज्जैनीमाता विद्यालयामध्ये सेंद्रिय किचन गार्डन विकसित करण्यात आले असून विद्यार्थ्यांना आंब्याची रोपे देण्यात आली. विद्यार्थी व युवकांसाठी अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याशिवाय नदी खोलीकरण व तलाव दुरुस्तीची कामे करण्यात आली असून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने उज्जैनी माता मंदिर परिसरात ५००० हून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली आहे. या मार्गदर्शन शिबिराला सुमारे ३५ महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमास नवजीवन प्रतिष्ठानचे ऋषिकेश राऊत, विनया मुळे, मनीषा मुळे, पूजा वाघ तसेच बचतगट पदाधिकारी व सभासद महिला बहुसंख्येने हजर होत्या.

# सावेडी राजस्थानी गणगौर परिवारातर्फे गणगौर विवाह सोहळा थाटात संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर सावेडी राजस्थानी गणगौर परिवारातर्फे प्रथेप्रमाणे चार दिवसीय गणगौर विवाह सोहळा येथील कोहिनूर मंगल कार्यालयात मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.

सौ. अश्विनी अमोल सोनी यांनी सावेडी राजस्थानी गणगौर परिवारातर्फे गेल्या ३६ वर्षांपासून गणगौर विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे, अशी माहिती दिली. त्या म्हणाल्या, प्रतिवर्षी या सोहळ्याच्या अगोदर १६ दिवस आपापल्या घरी कुमारिका गौर पूजा अत्यंत श्रध्देने करतात. ही पूजा गृहिणी म्हणून आपली संस्कृती महिलांना कसा मान देते, हा संस्कार युवतींमध्ये रूजवण्याचे महत्वपूर्ण कार्य करते.

वरपक्षाचे यजमान गोपाल संपदा दमानी तर वधुपक्षाचे यजमान संजय अर्चना पुगलिया दाम्पत्य होते. बाल रूपात ईसर, अद्विक दीपक भंडारी, गौराद हर्षिता, पवन तापड़िया होते.

कमिटी मेंबर्स सावेडी राजस्थानी गणगौर परिवार अहील्यानगरचे प्रतिभा बजाज, कविता भंडारी, अनुप्रीति झंवर, पुष्पा अटल, मोना सोनी, शितल कलंत्री, स्मिता दायमा, कांचन शर्मा, मेघा झंवर, वैष्णवी बजाज आदी उपस्थित होते.

यजमानांच्या हस्ते गण–गौरची विधीवत पूजा करण्यात आली. देवेंद्र दायमा यांनी पूजाविधी केले. कुंकुम, मुंगहात, झालावरणा. बेबिनायक हातधान, माहेरा, संगीतरजनी आणि विवाह सोहळा असे क्रमाने चार दिवस कार्यक्रम संपन्न झाले.

सावेडी परिसरामधून गण–गौरची भव्य वरात काढण्यात आली होती. या वरातीच्या अग्रभागी बॅण्डपथक होते. महादेवांच्या वेशभूषेत आणि पार्वतीमातेच्या वेशभूषेत मुले बग्गीमध्ये विराजमान झाली होती. पारंपारिक राजस्थानी नृत्याचे सादरीकरण करत युवती व महिलांनी वरातीचा मनमुराद आनंद लुटला.

या गण–गौर अर्थात शिव पार्वती विवाह सोहळ्यासाठी भाविक महिलांनी अथक परिश्रम घेतले. या सोहळ्यामध्ये सावेडी परिसरातील राजस्थानी परिवारातील स्त्री–पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थित सर्वांनी सात्विक प्रसाद भोजनाचा आस्वाद घेत या शिव पार्वती विवाह सोहळ्याची सांगता केली.

# आदिवासी शक्ती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आदिवासी पारधी समाजातील १६ वर्षीय चेंग चिंगळ्या काळे यांच्या संशयास्पद मृत्यूने जिल्ह्यात खळबळ उडाली असून या प्रकरणाची सखोल चौकशी सीआयडीमार्फत करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आदिवासी शक्ती संघटना व आदिवासी पारधी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

श्रीगोंदा तालुक्यातील वांगदरी येथील रहिवासी असलेल्या चेंग काळे याचा मृतदेह सुरेगाव येथील विहिरीत आढळून आला. विशेष म्हणजे, तो पोलिसांच्या ताब्यात असताना मृतावस्थेत कसा आढळला, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

निवेदनानुसार, २३ मार्च २०२६ रोजी पहाटे पोलिसांनी बाबुशा काळे, शुभम काळे, चेंग काळे व रवी भोसले या चौघांना



चौकशीच्या नावाखाली ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांना मारहाण करून दोन वाहनांमधून नेण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शी पूजा काळे यांनी पाहिल्याचा दावा करण्यात आला आहे. पुढे त्यांना बेलवंडी पोलीस ठाणे, पोलीस अधीक्षक कार्यालय (अहिल्यानगर), श्रीरामपूर व अकोले येथे नेण्यात आल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, २७ मार्च रोजी सुरेगाव येथील विहिरीत एका युवकाचा मृतदेह आढळून आला आणि तो चेंग काळे असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे ''पोलिस कस्टडीत असलेला युवक विहिरीत मृतावस्थेत कसा? असा सवाल उपस्थित झाला आहे असुन या प्रकरणाची सीआयडीमार्फत सखोल चौकशी करावी संबंधित सर्व पोलीस ठाण्यांची स्टेशन डायरी, सीसीटीव्ही फुटेज व अधिकाऱ्यांचे सीडीआर तपासावेत दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ॲट्रॉसिटी व सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा मृतदेहाचे पोस्टमार्टम पुणे येथील ससून रुग्णालयात व्हिडिओ चित्रीकरणासह करावे पीडित कुटुंबाला ५० लाख रुपयांची आर्थिक मदत व एका सदस्यास सरकारी नोकरी द्यावी ताब्यातील इतर युवकांची तात्काळ सुटका करावी.

# चक्रवर्ती सम्राट अशोक हेच खरे बौद्ध धम्माचे धम्मदायाद– भगवंतराव गायकवाड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेतर्फे चक्रवर्ती सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती नालंदा बुद्धविहार, गौतमनगर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान केंद्रीय शिक्षक भगवंतराव गायकवाड यांनी भूषविले. शहर, जिल्हा व जिल्हा महिला शाखेचे पदाधिकारी व प्रतिनिधी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आदर्शांचे पूजन करण्यात आले. यानंतर त्रिसरण पंचशील, बुद्ध पूजा, सम्राट अशोक स्फूर्ती गीत तसेच भीमस्मरण व भीम स्तुती घेण्यात आली. उपस्थित मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यांप्रसंगी महिला जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड,



ॲड. विद्याताई शिंदे तसेच रेखाताई भिंगारदिवे यांनी सम्राट अशोक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले. सरचिटणीस लक्ष्मण माघाडे यांनीही सम्राट अशोक यांच्या जीवनपटाचा आढावा मांडला.

अध्यक्षीय भाषणात भगवंतराव गायकवाड यांनी सम्राट अशोक यांचे बौद्ध धम्मातील योगदान अधोरेखित करत, ''सम्राट अशोक हेच खरे बौद्ध धम्माचे धम्मदायाद आहेत. त्यांनी आयुष्यभर बौद्ध धर्माच्या प्रचार–प्रसारासाठी कार्य केले. संपूर्ण आशिया खंडात बौद्ध धम्माचा प्रसार घडवून आणत स्तूप, चैत्य, लेणी व मठांची उभारणी केली. भगवान बुद्धांच्या धातूंवर हजारो बौद्ध स्थळांची निर्मिती करून त्यांनी धम्माचा अमूल्य वारसा निर्माण केला. स्वतः च्या मुलांनाही धम्मासाठी अर्पण करून त्यांनी आदर्श निर्माण केला,'' असे प्रतिपादन केले. तसेच संस्थेचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास जिल्हा संस्कार उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड, गोरख केदारे, जिल्हा महिला अध्यक्षा सुनीताताई गायकवाड, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, विजय पाटोळे, मिलिंद घाटेशाही, विजय शिंदे, राजेंद्र पाडळे, संजय डहाणे, शंकर पंडागळे, घोडके साहेब, हर्षा पंचमुख, विद्याताई शिंदे, घोडके ताई, रेखाताई भिंगारदिवे, भोसले ताई यांच्यासह अनेक बालक–बालिका उपस्थित होते.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकांना भाड्याच्या उत्पन्नावर आकारणी न करता क्षेत्रफळानुसार मालमत्ता कर आकारणी करावी



अहिल्यानगर- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारती व जमिनींचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी मे. सी.ई. इन्फो सिस्टीम लि. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. या संस्थेने भाडेकऱ्याकडून मिळणाऱ्या भाड्यावर आधारित करयोग्य मूल्य निश्चित करून मालमत्ता धारकांना नोटिसा पाठविल्या आहेत. ही व्यवस्था अहिल्यानगरच्या साध्या मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी असह्य झाली आहे.अहिल्यानगरमध्ये अल्पव्यवसायिक, ज्येष्ठ नागरिक आणि पेन्शन नसलेले कर्मचारी मोठ्या प्रमाणात आहेत. कर्ज घेऊन घरे बांधणारे हे कुटुंब भाड्याने मिळणाऱ्या अल्प उत्पन्नावर उदरनिर्वाह चालवतात. मात्र, नवीन घरपट्टी आकारणीत त्यांचे ५०% पेक्षा जास्त उत्पन्न महानगरपालिकेकडे जात आहे! उरलेल्या रकमेतून वीज बिल, आयकर, देखभाल, कर्ज हप्ता भागवणे अशक्य आहे. भाडेकरी सहा महिने राहिला तरी संपूर्ण वर्षाच्या भाड्यावर कर भरावा लागतो, ज्यामुळे हे कुटुंब उपाशी राहण्याच्या उंबरठ्यावर येत आहे. ही परिस्थिती हृदयद्रावक आहे. मालमत्ताधारकांना मिळणारे भाडे म्हणजे त्यांचे अंतिम आधारस्तंभ आहे.भाडे उत्पन्नावर आधारित कर आकारणी रद्द करावी.मालमत्ता कर क्षेत्रफळानुसार आकारावा. याशिवाय पुनर्मूल्यांकन रिव्हिजनसाठी मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लि. ला रु. १५ कोटी द्यावे लागतील, जी जनतेच्या करातून वसूल होईल. हा अन्यायकारक बोजा साध्या नागरिकांवर का? अशी मागणी नगरसेविका वैशाली नळकांडे यांनी मनपाच्या महासभेत निवेदन देऊन केली आहे.

### भिंगार छावणीतील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कसाठी पाण्याची सोय करा



अहिल्यानगर - भिंगार छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमधील वृक्षसंवर्धनासाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने पाण्याची व्यवस्था करण्याचे निवेदन छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांना देण्यात आले आहे. पार्कमध्ये पाणीपुरवठा आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांची भेट घेऊन हे निवेदन दिले. यावेळी छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी आणि मनोनीत सदस्य वसंत राठोड उपस्थित होते. गेल्या २५ वर्षांपासून हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण व संवर्धनाचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. मात्र, पार्कमधील पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. सध्या शिवाजी पार्कमधील विहिरीवरून पाणीपुरवठा होत असला, तरी ते पाणी कमी प्रमाणात आणि लांब अंतरावरून येत असल्याने संपूर्ण पार्कला पुरेसे पाणी मिळत नाही. यापूर्वी सहा वर्षांपूर्वी उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यावर ग्रुपच्या सदस्यांनी स्वतः पुढाकार घेत टँकरद्वारे महिनाभर पाणीपुरवठा करून झाडे वाचवली होती. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यातही झाडांच्या संरक्षणासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. छावणी कार्यालयाजवळील सर्व्हे नंबर १८४ मधील लष्करी डेअरी फार्म परिसरात मोठी विहीर असून त्यामध्ये मुबलक पाणी उपलब्ध आहे. सध्या त्या विहिरीतील पाण्याचा वापर होत नसल्याने ते पाणी जॉगिंग पार्कसाठी उपलब्ध करून देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यामुळे पार्कमधील पाणीटंचाई दूर होऊन वृक्षसंवर्धनाला मोठा हातभार लागेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# भगवान श्री परशुराम जन्मोत्सव कार्यक्रम पत्रिकेचे श्री विशाल चरणी अर्पण करून केला शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने दि १६ ते १९ एप्रिल रोजी १२ व्या भगवान श्री परशुराम जन्मोत्सव व अक्षय्य तृतीयेनिमित्त भव्य श्री परशुराम याग व विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले आहे. श्री विशाल गणपतीचे महंत योगी संगमनाथजी गुरू गेंडानाथजी महाराज यांच्या हस्ते श्री विशाल गणपतीला कार्यक्रमाची पत्रिका अर्पण करून शुभारंभ करण्यात आला. प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, ह. भ. प. प्रभाताई भोंग, डॉ. सतीश फाटके, डॉ. सौं. अंजली फाटके, यशवंत आंबेकर ,अरुण अवटी, चेतन वसगडेकर, सुरेश क्षीरसागर , नरेश व्यास, प्रमोद कुलकर्णी, अनिरुद्ध भऊरकर, अनंत कुलकर्णी , शिरीष देशपांडे, दत्तात्रय देशपांडे, उदय जोशी, श्रीया देशमुख, दीपाली उदास,सौं. कांचन तांबोळी,चि देवांग कुलकर्णी, चि सार्थक भोंग, चि अथर्व देशपांडे, कौस्तुभ देशमुख, प्रशांत भालेराव, सुनील बोपर्डीकर , विजय देशपांडे,अतुल शुक्ल, कैलास शिंदे,चि. अर्णव देशपांडे ,चि. भार्गव देशपांडे, चि. वेदांत कुलकर्णी, चि. देवांश कुलकर्णी, चि. आरोह भऊरकर, चि. रोहीत तांबोळी, नरेंद्र श्रोत्री, अमित डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

गुरुवार दि. १६ एप्रिल स. १० ते दु. २ सावेडी रोडवरील प्रकाश नेत्रालयात नेत्ररोग तपासणी शिबीर व नेत्रदान शिबीरात डॉ. राजीव चिटगोपेकर हे तपासणी करणार आहेत. यावेळी सर्व ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहे. शुक्रवार दि. १७ एप्रिल स. १० ते दु. २ नालेगावातील जनकल्याण रक्त केंद्रात कै. शशिकांत यशवंत गटणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबीर शनिवार दि. १८ एप्रिल स. ७ ते दु. २ चितळे रोडवरील ऋग्वेद भवनात भव्य श्री परशुराम याग प्रधान आचार्य वे.शा.सं.श्री. सिध्देश्वर निसळ यांच्या उपस्थितीत प्रमुख यजमान भगवान देशमुख व सौ. माधुरी देशमुख , संजय देशमुख व सौ. अंजली देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.दुपारी महाप्रसाद आयोजन केले आहे.

रविवार दि. १९ एप्रिल भव्य पायी शोभायात्रा सायं. ४.३० ते ६.३० रेणुकामाता मंदिर (प्रोफेसर कॉलनी चौक) ते भिस्तबाग चौक, सावेडी भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाची सांगता होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष समर्थभक्त मंदारबुवा रामदासी असून आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर हे उपस्थित राहणार आहेत. भगवान परशुराम जन्मोत्सवाचे प्रवचन ह.भ.प. कुं. रेणुकाताई निसळ यांचे होणार असून महाआरती सांगता होईल.अशी माहीती संयोजन समिती दिली आहे.

# मनपा सांस्कृतिक स्पर्धेत बाई इचरज बाई फिरोदिया प्रशालेचा प्रथम क्रमांक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगर पालिका शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर महासंघ , न.पा , मनपा शिक्षक संघ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सांस्कृतिक स्पर्धेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटी ची बाई इचरज बाई फिरोदिया प्रशालेने इयत्ता पहिली ते चौथी च्या गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

माऊली संकुल सभागृहात शुक्रवार दिनांक २७ एप्रिल रोजी या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील पहिली ते चौथी च्या गटामध्ये १६ तर पाचवी ते सातवी च्या गटात १५ शाळांनी या संस्कृतिक स्पर्धेत सहभाग घेतला होता. महाराष्ट्राची लोकधारा हा विषयावर असणाऱ्या या नृत्य स्पर्धेत बाई इचरज बाई फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी देवीचा गोंधळ हा नृत्य आविष्कार सादर केला. या नृत्याने प्रेक्षक आणि परीक्षकांना मंत्रमुग्ध केले. या नृत्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले. या नृत्यामध्ये प्रशालेतील पहिली ते चौथीच्या गटात खुरंगे राजवी,पवार कृपा, पंडित आर्या,गुंजाळ श्रेया,शिंदे शर्वरी, मोरे शर्वरी, गोरे श्रेया, ढवळे रितीशा, नागुलपेल्ली देवांशी, जाधव वीरा, साठे वसुधा,श्रीराम शिवन्या , कोठुळे जान्हवी,पवार वंशिका, थोरवे काव्यांजली, साळुंके वैष्णवी, मोकाटे स्वरांजली, गवांडे वेदश्री, सोनवणे अनिशा, बलदवा शरन्या, पाटील अद्विका, बनसोडे आरोही, साळवे जयेश, भिंगारदिवे वैभवी, भुजबळ अर्णव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना अनुभव चव्हाण आणि सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

### बालरोग तपासणी शिबिरात ७० रुग्णांची तपासणी

# रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा - महेश मुनोत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ट सर्जरी सेंटरमध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मरणानिमित्ताने महावीर जाप ग्रुपच्या वतीने बालरोग तपासणी शिबिराचे महावीर जाप ग्रुपच्या सर्व सदस्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. आनंद मुथा, महावीर मुथीयान,अभय पुंगलीया,आनंद पितळे, सुबोध बोथरा, शुभांगी पितळे,पियुष मंडलेचा, प्रदिप नहार, जिग्नेश सोळंकी, महेश मुनोत, महेश गुंदेचा,सौ.सोनाली मुनोत,महेश भळगट, प्रल्हाद जोशी, सुरेंद्र गांधी,सौ.अश्विनी गांधी, जगदिश पटेल, संतोष बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.वसंत कटारिया, माणकचंद कटारिया,अभय गुगळे, सुभाष मुनोत , वसंत चोपडा,प्रकाश छल्लानी, डॉ.वैभवी वंजारे, डॉ.दीपी अग्रवाल, डॉ.विजय साठे, डॉ.गणेश गव्हाणे, डॉ. रूपेश सिकची आदी मान्यवर उपस्थित होते.

महेश मुनोत म्हणाले महावीर जाप ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने हा उपक्रम आम्ही करत आहोत रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा आहे म्हणून समाजातील दीनदुबळ्यांची सेवा करण्याची संधी आनंद ऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून आम्हाला मिळत आहे हे आमचे भाग्य आहे. मुल हे उद्याचे भविष्य असल्याने त्यांचे निरोगी आरोग्य महत्वाचे आहे.

महेश भळगट म्हणाले वाढता ताणतणाव, अनियमितता यामुळे आज प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या आजाराने त्रस्त आहे परंतु पैशाअभावी त्याकडे दुर्लक्ष करतो जैन सोशल फेडरेशन च्या माध्यमातून रुग्णांना वेळीच उपचार मिळाल्याने ते बरे होण्यास मदत होते .

डॉ.गणेश गव्हाणे म्हणाले आनंद ऋषीजी हॉस्पिटलमध्ये जन आरोग्य योजना च्या माध्यमातून गरजूंना सेवा देण्याचे काम आम्ही सातत्याने करत आहोत कोणताही उपचार वेळीच केल्यास त्याचा रुग्णाला फायदा होतो रुग्ण लवकर बरा होतो. या माध्यमातून लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, उपचार येथे होत आहेत.

**प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले**

महावीर जाप ग्रुप हा पार्टी करण्या ऐवजी आरोग्याच्या या सेवा यज्ञात सातत्याने सहकार्य करत आहे हे महत्वाचे असून चांगले काम घडत आहे समाजातील सर्व घटक एकत्र आल्यामुळेच हे कार्य चालू आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लानी यांनी मानले. या शिबीरात सुमारे ७० रूग्णांची तपासणी करण्यात आली.

# प्रा. गोकुळ सोनवणे यांना मार्केटिंग मॅनेजमेंट विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

### पुणे जिल्ह्यातील स्टार हॉटेल्सच्या अभ्यासावर आधारित संशोधन; संस्थेकडून सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, अहिल्यानगर येथील प्रा. गोकुळ त्र्यंबक सोनवणे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने मार्केटिंग मॅनेजमेंट या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक कार्याला नवे बळ मिळाले असून परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रा. सोनवणे यांच्या संशोधन प्रबंधाचा विषय ग्राहकांच्या वर्तनावर विपणन धोरणांचा प्रभाव : पुणे जिल्ह्यातील स्टार हॉटेल्सचा अभ्यास असा असून, त्यांनी आधुनिक विपणन तंत्रज्ञान, ग्राहकांची मानसिकता, सेवा क्षेत्रातील स्पर्धा आणि ग्राहक समाधान यांचा सखोल अभ्यास या प्रबंधातून मांडला आहे. विशेषतः हॉटेल उद्योगातील बदलते ट्रेंड, डिजिटल मार्केटिंगचा प्रभाव आणि ग्राहकांच्या अपेक्षांमध्ये झालेला बदल यांचे त्यांनी अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे.

त्यांच्या संशोधनामुळे हॉटेल आणि सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांना ग्राहकाभिमुख धोरणे आखण्यास दिशा मिळणार असून, पर्यटन व



आतिथ्य व्यवसायाच्या प्रगतीसाठी हा अभ्यास उपयुक्त ठरणार असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसाठीही हा प्रबंध मार्गदर्शक ठरणार आहे.

प्रा. सोनवणे यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष मा. डॉ. विवेक भापकर, सचिव मा. ड. विश्वासराव आठरे पा., सह-सचिव मा. श्री. मुकेश मुळे तसेच खजिनदार मा. ड. दीपलक्ष्मी म्हसे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन व शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी आपल्या भाषणात प्रा. सोनवणे यांच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे कौतुक करत, संस्थेतील इतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. नंदकुमार जगताप यांनी प्रा. सोनवणे यांच्या संशोधनामुळे संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावली असल्याचे सांगितले. प्राचार्या योगिता सदरे यांनी त्यांच्या यशाचे स्वागत करत, भविष्यातही अशाच प्रकारे नावीन्यपूर्ण संशोधन घडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या प्रसंगी विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब शेंडगे, प्रा. रचना खटावकर, प्रा. वाहिद मणियार, प्रा. सागर माळवदे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी प्रा. सोनवणे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. प्रा. गोकुळ सोनवणे यांच्या या यशामुळे केवळ संस्थेचा नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास हातभार लागणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### भगवान महावीर व्याख्यानमाला – पुष्प सहावे

# सर्व गुन्हे माफ करणारे एकमेव न्यायालय म्हणजे आई–बाप – वैभव ढुस

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सर्व गुन्हे माफ करणारे एकमेव न्यायालय म्हणजे आई–बाप होत, असे प्रतिपादन श्री.वैभव ढुस (देवळाली प्रवरा) यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे सहावे पुष्प गुंफताना आत्मविश्वासाने प्रगती या विषयावर ते बोलत होते. सिमा मुनोत यांनी स्वागत केले. सिमरन मुनोत यांनी परिचय करून दिला. श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला), यश मुनोत, राहुल मुनोत यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान



करण्यात आला. यावेळी सुरेश कटारिया, संतोष गांधी, रमेश भंडारी, संजय गांधी आदी उपस्थित होते. सपना कटारिया यांनी आभार मानले.

श्री.ढुस पुढे म्हणाले, आई झाल्याशिवाय आई कळत नाही. बाप झाल्याशिवाय बाप कळत नाही. आपण जीवनातील मार्गावर चालायला सुरुवात केली की, पुढचा मार्ग दिसत जातो. हुशार व्यक्तींसोबत, ज्ञानवंतांसोबत आणि विचारवंतांसोबत आपण राहिलो तरी स्वतःला सिद्ध करण्यासाठी कार्य प्रवृत्त व्हावेच लागते. आपल्या कौशल्यावरच जगणं सुकर होत जाते.

आपल्या मुलांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान द्या. स्किल डेव्हलपमेंटवर भर द्या. आज १६ वर्षाच पोरगं म्हणतंय मी डिप्रेशनमध्ये आहे. ज्याला डिप्रेशनचं स्पेलिंगही नीट लिहिता येत नाही. सोशल मीडियामुळे आजच्या तरुण पिढीत डिप्रेशनचे प्रमाण वाढले आहे. सोशल मीडियाकडून आपण काय घेतो? हे महत्त्वाचे! आपली विचारसरणी सोशल मीडियाने बदलली नाही ना? याचे गांभीर्याने चिंतन करा, असे आवाहन वैभव ढूस यांनी केले.

विजयकुमारजी मुनोत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेच्या मुख्य प्रायोजक श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आहेत.

### प. .पु.आनंदऋषीजी यांच्या मानवसेवा हीच ईश्वर सेवेला अनुसरूनच

# रक्तदानासारख्या लोकउपयोगी, पुण्यकर्मी उपक्रमास मर्चन्ट बँकचे सातत्यपूर्ण सहकार्य -हस्तीमलजी मुनोत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैनाचार्य आचार्य प.पु.आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्य स्मृती दिनानिमित्त श्री तिलोकरत्न जैन स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड,आनंदसेवा मानव सेवा केंद्र यांच्या विद्यमाने व.अहमदनगर मर्चन्ट को.ऑप.बँकेच्या सहकार्याने भक्त निवास येथे शनिवारी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन मर्चन्ट बँकेचे चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते प.पु.आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रतिमेस चंदनाचा पुष्पहार अर्पण करून करण्यात आला.

शिबिराच्या प्रारंभी प.पु.अलोकऋषीजी म.सा.यांनी या स्तुत्य उपक्रमासाठी मंगलपाठ दिला.याप्रसंगी धार्मिक परीक्षा बोर्ड चे अध्यक्ष नेमीचंदजी चोपडा,कांतीलालजी दुगड,मर्चंट्स चे व्हॉ.चेअरमन अमित मुथा,नगरसेवक प्रकाश भागानगरे,श्रीमती मीनाताई मुनोत, आयोजक मानव सेवा समितीचे आनंदरामजी मुनोत, सेक्रेटरी डॉ विजय भंडारी, मर्चन्ट बँकेचे संचालक सर्वश्री अनिल पोखर्णा,किशोर गांधी,सी,ए.मोहन बरमेचा,



संजय चोपडा,किशोर मुनोत,संजय बोरा,सी,ए.अजय मुथा, संजीव गांधी, विजय कोथिबिरे,सुभाष बायड, बडीसाजन ओसवाल महासंघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, एडव्होकेट.शरद पल्लोड, बँकेचे अतिरिक्त मुख्य.कार्य, अधिकारी नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा.मानव सेवा समितीचे रमेश पितळे,गौतम बोरा, अतुल बोरा, डॉ.रसिक मुथा, शिवाजी आव्हाड, डॉ.विजय पितळे, आनंदऋषीजी ब्लड बँकेचे गणेश कांकरिया ,अशोक कोठारी ,डॉ.प्रकाश कांकरिया,डॉ.सुधा कांकरिया, सागर गांधी याप्रसंगी उपस्थित होते,

शिबिराच्या प्रारंभी डॉ विजय भंडारी यांनी उपस्थितांचे स्वागत करून या महारक्तदान शिबिराचे यंदाचे ३४ वे वर्ष असून या पुण्यकर्माच्या ,मानवसेवेच्या शिबिरात आजपर्यंत २५ हजार पुरुष व् ७,५०० महिलांनी सहभाग नोंदवून या महान कार्यात आपले योगदान दिले आहे.मर्चन्ट बँकेनेही सातत्याने या उपक्रमास सातत्याने पाठबळ दिल्या बद्धल त्यांनी आभार व्यक्त केले. मर्चन्ट बँकेचे चेअरमन हस्तीमलजी मुनोत बोलताना म्हणाले कि परमपूज्य आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या मानवसेवा हीच ईश्वर सेवायाला अनुसरूनच अश्या सामाजिक ,लोकउपयोगी ,पुण्यकर्मी उपक्रमास मर्चन्ट बँक शिबिराच्या सुरवातीपासून(३४ वर्षांपासून ) सातत्याने सहकार्य करत असून असेच सहकार्य कायम राहील अशी ग्वाही देऊन रक्दात्यांचे आभार मानले.

नेमीचंदजी चोपडा यांनी महा रक्तदान शिबिराच्या सातत्यपूर्ण आयोजनाचे कोतुक केले.राज्यामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात अश्या रक्तदान शिबिरातील महिलांचाही सहभाग वाखण्याजोगा असून हे निश्चितच विक्रमी असे शिबिरच म्हणावे लागेल हजारो लाखोरुग्णाच्या जीवनात नवसंजिवनी देणारे हे शिबीर अनुकरणीय व अभिनंदनीय असे आहे.या संस्थेच्या पुढील कार्यास मी सुयश चिंतितो . आभार आनंदरामजी मुनोत यांनी मानले.

या महाशिबिराचे ३४ वे वर्ष आजपर्यंत २५ हजार पुरुष व ७.५०० हजार महिलांचा सहभाग.

# ‘फिटनेस हीच खरी संपत्ती’ – उपप्राचार्य अनिल आठरे

## मेरा युवा भारतच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांनी न्यू आर्ट्स महाविद्यालय गाजले कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉलसह वैयक्तिक स्पर्धांमध्ये खेळाडूंची दमदार कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालयाच्या मेरा युवा भारत अहिल्यानगरच्या वतीने न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयात जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल या सांघिक खेळांसोबतच गोळा फेक आणि धावणे या वैयक्तिक स्पर्धांनीही रंगत आणली. अत्यंत चुरशीच्या लढतींमुळे संपूर्ण परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. महाविद्यालयाच्या जिमखाना मैदानावर खेळाडूंची लगबग पाहायला मिळाली.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल आठरे यांच्या हस्ते झाले. यावेळी मेरा युवा भारतचे सत्यजीत संतोष, जिमखाना चेअरमन अनंत पंडित, शरद मगर, धन्यकुमार हराळ, रमेश गाडगे, श्रीकृष्ण मुरकुटे आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते.

प्रास्ताविकात शरद मगर यांनी सांघिक खेळांसोबत वैयक्तिक स्पर्धांचेही आयोजन महत्त्वाचे असल्याचे सांगितले. शासकीय



स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्यास खेळाडूंच्या करिअरला चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. न्यू आर्ट्स महाविद्यालयातून अनेक दिग्गज खेळाडू घडले असून त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे. विशेषत: कबड्डी संघाने राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केल्याचेही त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य अनिल आठरे यांनी आपल्या भाषणात खेळाडूंच्या फिटनेसचे महत्त्व अधोरेखित केले. ‘‘चांगले आरोग्य असेल तरच खेळाडू आपल्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात. शरीर हीच खरी संपत्ती आहे, त्यामुळे प्रत्येकाने फिटनेसकडे लक्ष देणे आवश्यक आहे,’’ असे ते म्हणाले.

सत्यजीत संतोष म्हणाले की, मेरा युवा भारत हा उपक्रम केवळ क्रीडा स्पर्धांपुरता मर्यादित नसून, तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. आजच्या स्पर्धांमधून खेळाडूंमध्ये असलेली ऊर्जा, जिद्द आणि स्पर्धात्मक वृत्ती स्पष्टपणे दिसून येते. ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळाल्यास तेही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवू शकतात, यावर आमचा विश्वास आहे.

क्रीडा क्षेत्र हे केवळ शारीरिक ताकदीचे नसून मानसिक स्थैर्य, शिस्त आणि टीमवर्क शिकवणारे माध्यम आहे. अशा स्पर्धांमधून खेळाडूंमध्ये आत्मविश्वास वाढतो. पुढील काळात अधिक मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आयोजित करून अधिकाधिक युवकांना संधी देण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

संपूर्ण स्पर्धा उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय जिमखाना विभागाचे विशेष सहकार्य लाभले.

# अवाजवी घरपट्टी–पाणीपट्टी कमी करा; मनपा महासभेत नगरसेवक रवींद्र बारस्कर यांची मागणी

**। रिव्हिजनमुळे नागरिकांवर आर्थिक बोजा; भाडेकरू दराने ३०% वाढीव आकारणीचा आरोप । पाणीपुरवठा अनियमित, तरीही २४०० रुपयांची आकारणी; नागरिकांत नाराजी । महासभेत विषय मांडून तातडीने निर्णय घेण्याची मागणी; पेन्शनधारक नागरिकांवर वाढीव कराचा ताण**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना अवाजवी दराने आकारण्यात आलेली घरपट्टी व पाणीपट्टी कमी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे महासभेत निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महानगरपालिका ही नागरिकांना सेवा देणारी संस्था असून प्रशासकीय काळात इमारत व जमिनीचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी मे. सि.ई. इन्फो सिस्टीम लि. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. या संस्थेमार्फत करण्यात आलेल्या पुनर्मूल्यांकनाच्या आधारे मालमत्ता धारकांना सुधारित कर नोटिसा देण्यात आल्या आहेत.

मात्र, या नोटिसांमधील घरपट्टीबाबत अनेक नागरिकांनी हरकत अर्ज दाखल केले असून त्यावर प्रभाग कार्यालयामार्फत सुनावण्या घेण्यात आल्या आहेत. तरीही अद्याप या हरकतींवर अंतिम निर्णय कळविण्यात आलेला नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.



निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, स्वमालकीच्या घरांमध्ये भाडेकरूंना राहण्यासाठी जागा देणाऱ्या घरमालकांवर भाडेकरू दराने सुमारे ३० टक्के वाढीव व्यावसायिक कर लावण्यात आला आहे. त्यामुळे घरमालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत असून ही आकारणी ‘‘पठाणी पद्धतीने’’ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शहरात मोठ्या प्रमाणावर पेन्शनधारक नागरिक वास्तव्यास असून त्यांची मुले नोकरीनिमित्त बाहेरगावी राहतात. अशा परिस्थितीत स्वतःच्या उत्पन्नावर कुटुंब चालवणाऱ्या या नागरिकांवर वाढीव घरपट्टीचा अतिरिक्त बोजा पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यापूर्वी सन २००३ मध्ये करण्यात आलेल्या पुनर्मूल्यांकनात आरसीसी, लोडबेअरिंग व पत्रा घरांवर माफक दराने कर आकारणी करण्यात आली होती. मात्र, सध्या आकारण्यात आलेली घरपट्टी ही अत्यंत जादा असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

शहर व उपनगरांतील अनेक भागांमध्ये ५ ते ६ दिवसांनी पाणीपुरवठा होत असतानाही नागरिकांकडून दरवर्षी सुमारे २४०० रुपये पाणीपट्टी आकारली जात असल्याचा मुद्दाही बारस्कर यांनी उपस्थित केला आहे. गोरगरीब नागरिकांवर याचा मोठा आर्थिक परिणाम होत असल्याने पाणीपट्टीचा दर कमी करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्रोत म्हणजे घरपट्टी, पाणीपट्टी व गाळेभाडे असून अनेक मालमत्तांची नोंद नसल्यामुळे उत्पन्न कमी प्रमाणात मिळत आहे. यामुळे विकासकामांवरही परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# चहाचा त्याग करणाऱ्या महिलांचा पृथ्वी फाउंडेशनतर्फे सन्मान

## ग्रामीण महिलांनी उद्योजकतेकडे वळावे : धायगुडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पृथ्वी फाउंडेशन, महाराष्ट्र च्या वतीने ‘‘प्रेरणा, परिवर्तन आणि प्रगती’’ या महिला सन्मान व उद्योजकता विशेष कार्यक्रमाचे पारोडी (ता. आष्टी) येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात चहा त्याग करून आरोग्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल टाकणाऱ्या आठ महिलांचा पैठणी देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पारोडी गावचे सामाजिक कार्यकर्ते बंकट परकाळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक अशोक धायगुडे, पत्रकार सूर्यकांत वरकड उपस्थित होते. तर आदर्श शिक्षक अण्णासाहेब घोडके, युवा उद्योजक शहाजी कर्पे, बाळासाहेब झांबरे, सुलेमान देवळ्याचे उपसरपंच भाऊसाहेब घोडके, कर्जत न्यायालयातील वरिष्ठ लिपिक रवी मुटकुळे, माजी सरपंच ज्ञानदेव मिसाळ, रामदास बांडकर, आकाश गांगर्डे, जालिंदर सायंबर, कृष्णा सायंबर, अशोक सायंबर, पृथ्वी फाउंडेशनचे दादासाहेब घोडके यांची उपस्थिती होती.

उद्योजक अशोक धायगुडे यांनी ‘‘उद्योग कसा उभारावा’’ या विषयावर मार्गदर्शन करताना नियोजन, सातत्य, मेहनत आणि योग्य निर्णय या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकला. त्यांनी ग्रामीण भागातील युवक–युवतींनी उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन केले.

कवी व पत्रकार डॉ. सूर्यकांत वरकड यांनी आईवरील हृदयस्पर्शी कविता सादर करून उपस्थितांना भावूक केले. आदर्श शिक्षक अण्णासाहेब घोडके यांनी फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक करत शिक्षण व आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पृथ्वी फाउंडेशनचे खजिनदार दादा घोडके यांनी केले. अध्यक्ष प्रा. अमोल जालिंदर सायंबर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पृथ्वी फाउंडेशन हे शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि समाजसेवा या चार घटकांवर कार्य करत असून महिलांनी चहा सोडणे हे आरोग्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. नवनिर्वाचित पोलीस पाटील भीमराज मिसाळ व सीमा रोहिदास घालमे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रकाश परकाळे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात बंकट परकाळे व गोकुळ काळे यांनी कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन तंबाखू सोडण्याचा संकल्प जाहीर केला.

# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्यासाठी माळीवाडा वेस पाडण्याची ५७ नगरसेवकांचे महापौर, उपमहापौर यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्यासाठी माळीवाडा वेस पाडण्याची ५७ नगरसेवकांनी महापौर ज्योती गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या कडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे.

सदर निवेदनावर नगरसेवकांच्या सहया आहेत या निवेदनात म्हटले आहे की, फुले दांपत्य स्मारक समितीने यापूर्वी ११ मार्च २०२६ रोजी महानगरपालिकेच्या आयुक्तांकडेही यासंदर्भात निवेदन दिले होते. माळीवाडा



वेस ही सुमारे ४०० वर्षे जुनी असून तिची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे. तसेच प्रस्तावित स्मारकासाठी उपलब्ध जागा अपुरी पडत असल्याने वेस पाडण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे म्हणणे आहे.समितीच्या मते, स्मारक असे उभारण्यात यावे की ते भोवतालच्या पाचही रस्त्यांवरून स्पष्टपणे दिसावे. तसेच स्मारकाभोवती आकर्षक विद्युत रोषणाई, सुशोभीकरण आणि संरक्षणासाठी कुंपण करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला साजेसा भव्य स्मारक उभारण्यासाठी हा विषय महानगरपालिकेच्या विशेष सभेत तातडीने मांडण्यात यावा अशी मागणी ५७ नगरसेवकांनी केली असून निवेदनावर ५७ नगरसेवकांच्या सह्या आहेत.

# आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथे महाप्रसाद भोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज हे मानवतेची शिकवण देणारे महान संत होते. देशभरातील जैन समाजाचे ते श्रद्धास्थान आहेत. नगरची भूमी त्यांच्या वास्तव्याने, पदस्पर्शाने पावन झालेली आहे. आचार्यश्रींचे संस्कार व शिकवण याचे तंतोतंत पालन जय आनंद महावीर युवक मंडळ करताना दिसून येते. दरवर्षी होणारा अन्नदानाचा उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. दरवर्षी मंडळाचे सदस्य आचार्यश्रींच्या स्मृतीत उत्स्फूर्त रक्तदान करतात हे सुद्धा अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन उद्योजक मोहनलाल मानधना यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने महाप्रसाद भोजनाचे आयोजन करण्यात आले. या महाप्रसाद



वाटपाच्या शुभारंभ प्रसंगी मोहनलाल मानधना बोलत होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, ग्राहक भांडारचे चेअरमन विक्रम फिरोदिया, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, नगरसेवक गणेश भोसले, अविनाश घुले, प्रकाश भागानगरे आशाताई डागवाले, माजी महापौर भगवान फुलसोंदर, मनोज लोंढे, सेक्रेटरी आनंद मुथा, उपाध्यक्ष कुंतीलाल राका, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, अजित गांधी, चेतन गुगळे आदींसह मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

उद्योजक नरेंद्र फिरोदिया की, अन्नदान आतून मिळणारे पुण्य सर्वात मोठे पुण्य असते. जय आनंद महावीर युवक मंडळाच्या सर्व सदस्यांनी राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीदिनी दरवर्षी अन्नदान करण्याचा उपक्रम राबवित आहेत. आचार्यश्रींची मानवतेची, सेवेची शिकवण मंडळ अतिशय चांगल्या पध्दतीने अंमलात आणत आहे.

प्रास्ताविकात शैलेश मुनोत यांनी सांगितले की, आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या शिकवणुकीप्रमाणे कार्य करणाऱ्या जय आनंद महावीर युवक मंडळाने आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी अन्नदानाचा उपक्रम सुरू केला. दरवर्षी अनेकांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविला जातो. मंडळ यंदा रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना अन्नदान उपक्रम राबवताना विशेष आनंद होत आहे.

यावर्षीही सर्वांना बुंदी, पुरी भाजी, मसालेभात असा रूचकर मेन्यू देण्यात आला. याशिवाय शहरातील वंचित, अनाथ, अपंग मुलांच्या विविध संस्थांनाही भोजन पोहोच करण्यात आले. भोजनावेळी सर्वांसाठी टेबल खुर्च्यांची तसेच थंडगार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली तसेच उन्हाळा लक्षात घेवून कुलरचीही व्यवस्था केली. आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी मंडळाकडून दरवर्षी अन्नदान केले जाते, यातून प्रत्येकाला आनंदाची अनुभूती येते. जय आनंदचा जयघोष, डाळरोटी खाओ, प्रभू के गुण गाओ अशी प्रार्थना करीत मंडळाच्या महाप्रसाद भोजनाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. शेवटी मनोज गुंदेचा यांनी आभार मानले.

(पान १ वरून)

## शहर विकासासाठी बँका व लोकप्रतिनिधींचा समन्वय महत्त्वाचा – महापौर ज्योतीताई गाडे

आहेत, ही अभिमानाची बाब आहे. विशेषतः महिला बचत गट, लघुउद्योग आणि नवउद्योजकांना आर्थिक पाठबळ देऊन बँक शहराच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अशा सकारात्मक उपक्रमांमुळे समाजातील प्रत्येक घटकाला प्रगतीची संधी मिळते.

या प्रसंगी बँकेचे चेअरमन अनिल झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, रामसुख मंत्री, नामदेव लंगोटे, राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णू फुलसौंदर, एकनाथ जाधव, महेश झोडगे, कैलास रासकर, रुपेश भंडारी, कैलास दळवी, श्रीमती तिलोतमा करांडे, माधवराव गोंधळे, राजेंद्र बोरा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी चेअरमन अनिल झोडगे यांनी सांगितले की, भिंगार अर्बन बँक ही नेहमीच समाजहिताचे कार्य करत आली आहे. शहराच्या प्रगतीत लोकप्रतिनिधींचे योगदान महत्त्वाचे असून, त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भविष्यातही बँक सामाजिक व आर्थिक क्षेत्रात नवे उपक्रम राबवणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन म्हणाले की, भिंगार अर्बन बँक ही केवळ आर्थिक संस्था नसून, समाजाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असलेली एक विश्वासार्ह संस्था आहे. शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी आणि नागरिकांना सक्षम करण्यासाठी बँकेने विविध उपक्रम राबवले आहेत. लोकप्रतिनिधी आणि बँक यांचा समन्वय वाढवून अधिक व्यापक विकास साध्य करण्याचा आमचा प्रयत्न राहील. संचालक विष्णू फुलसौंदर व नामदेव लंगोटे यांनी मनोगत व्यक्त करत बँकेच्या कार्याची माहिती दिली. आभार प्रदर्शन कैलास रासकर यांनी मानले.

## माळीवाडा वेस हा निजामशाहीचा कलंक, तो पुसला जावा ही फुलेप्रेमींची इच्छा...

महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीने माळीवाडा वेस पाडावी हा ठराव केलेला आहे. या ठरावाला विविध ज्ञाती समाज, नगर शहरातील गणेश मंडळे, ज्येष्ठ नागरिक संघ, तसेच शहरातील ५७ नगरसेवकांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला आहे. परंतु फुले दांपत्य समितीच्या ‘‘माळीवाडा वेस पाडावी‘‘ या ठरावाला विरोध करण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांना पत्र दिले आहे. माळीवाडा वेस पडू नये, महात्मा फुले यांच्या स्मारकाचे काम सुरू होऊ नये यासाठी खा. लंके प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे, असे सांगून भुजबळ म्हणाले की, खा. लंके यांनी स्मारकाचे रखडलेले काम सुरू होण्यासंदर्भात महापालिकेत कोणताही पाठपुरावा केलेला दिसत नाही. त्यांनी नगर शहराच्या विकासासाठी काय योगदान दिले ते सांगावे. शहर विकासासाठी दिल्ली वारी करावी. केवळ फुलेप्रेमींना विरोध करण्यासाठी खासदारांचा अट्टहास सुरू असल्याचे दिसत आहे. त्यामुळे फुलेप्रेमींच्या भावना दुखावल्या असून, नगर जिल्ह्यातील फुलेप्रेमींनी खा. लंकेंचा जाहीर निषेध केलेला आहे. यापुढील काळात फुले दांपत्याच्या स्मारकाला विरोध करणाऱ्यांना चोख उत्तर दिले जाईल. लोकप्रतिनिधींनी जनसामान्यांच्या भावनांचा विचार करावा, अन्यथा फुलेप्रेमी मोठे जनआंदोलन उभारतील, असा इशाराही बाळासाहेब भुजबळ यांनी दिला आहे.

## लॉकडाऊनच्या अफवा पसरविणाऱ्यांवर कडक कारवाई करणार – फडणवीस

पीएनजी गॅस पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. याचं काम जलदगतीने सुरू आहे. त्यासंबंधी सरकारने एक आदेश काढलेला आहे. शहरांवरील एलपीजीचा लोड कमी करून पीएनजीवर भर दिला जाणार आहे. पीएनजीमुळे एलपीजीची भविष्यात समस्या किंवा अडचण येणार नाही.

आजूबाजूच्या देशात लॉकडाऊन सुरू असताना आपल्या देशात मात्र त्यावर कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. जरी तेलाच्या किमती वाढल्या असल्या तरी त्याचा परिणाम सामान्य ग्राहकांवर पडू दिला नाही. एलपीजी गॅसचाही कुठेही तुटवडा नाही. देशात जर कुणी अफवा पसरवून गोंधळाची स्थिती निर्माण करत असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लॉकडाऊन होणार असल्याच्या ज्या अफवा पसरवल्या जात आहेत, त्यावर कारवाई केली जाणार आहे.‘‘

# प्रोफेसर कॉलनी चौकातील कचरा डम्पिंग तातडीने हलवा; संभाजी महाराज पुतळा परिसरात सुविधा द्या

**दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात; महिन्याभरात हलवले नाही तर उपोषणाचा इशारा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रोफेसर कॉलनी चौक परिसरातील महानगरपालिकेचे कचरा डम्पिंग स्टेशन तातडीने अन्यत्र हलविण्यात यावे, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात योग्य विद्युत व्यवस्था व सांडपाणी निचरा करण्याची सोय करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका सुनिता कुलकर्णी, सोनाबाई शिंदे तसेच नगरसेवक मनोज दुल्लम व करण कराळे यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रोफेसर कॉलनी चौक हा अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून नाट्यगृहाच्या शेजारीच महानगरपालिकेचे कचरा डम्पिंग स्टेशन कार्यरत आहे.

यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

याच ठिकाणी अलीकडेच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आलेला



असल्याने नागरिकांची वर्दळ वाढली आहे. परिसरातील नागरिकांनी हे डम्पिंग स्टेशन अन्यत्र हलविण्याची वारंवार मागणी केली आहे.

जर पुढील एक महिन्यात डम्पिंग स्टेशन हलविण्यात आले नाही, तर नागरिक व संबंधित नगरसेवक उपोषणाचा मार्ग अवलंबतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

प्रोफेसर चौकातील संभाजी महाराज पुतळा परिसरात महानगरपालिकेमार्फत उद्यान विकसित करण्यात आले असले तरी, येथील विद्युत व्यवस्था अत्यंत अपुरी व निकृष्ट असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

रात्रीच्या वेळी पुतळा अंधारात राहत असल्याने त्याचा गौरव कमी होत आहे. यासाठी पुतळा परिसरात एक हायमास्ट तसेच उच्च प्रतीचे एलईडी दिवे बसविण्याची मागणी करण्यात आली आहे, जेणेकरून परिसर प्रकाशमान राहील. पुतळा परिसरात सांडपाणी व पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याची योग्य व्यवस्था नसल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते.

यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो तसेच अपघाताची शक्यता वाढते, असा मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.